Golden Resrach Thoughts
Vol -2 , ISSUE –IX, March - 2013
ISSN No-2031-5063
Available online at www.aygrt.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# आद्य अस्पृश्योध्दारक : गोपाळबाबा वलंगकर

**प्रा. गोपीचंद या. कठाणे**
स्व. राजेंद्रसिंह उर्फ बाबा व्यास कला वाणिज्य महाविद्यालय कोंढाळी,जि. नागपूर

**प्रस्तावना:**

भारतामध्ये ब्रिटिश राजवट स्थिर झाल्यानंतर महाराष्ट्रात आलेल्या एल्फिस्टन कैंडी सारख्या शिक्षण प्रेमी ब्रिटिश अधिकाऱ्यांने हिंदी जनते करिता प्रयत्नपूर्वक शिक्षण प्रसारचे कार्य सुरू केले. प्रारंभी जुन्या शाळांना सरकारी अनुदान देऊन त्या शाळांमधून इंग्रजी शिकण्याची तरतूद केली. परिणामी जुन्या संस्कृत विद्येचे महत्त्व कमी होऊ लागले.या पाश्चिमात्य शिक्षणामुळे सरकारी नोकरीत हिंदी तरुणाचा समावेश होऊ लागला. याच शिक्षणाचा फायदा गोपाळबाबा वलंगकर यांनाही झाला. त्यातूनच त्यांच्या सामाजिक कार्याची जडणघडण घडत गेली. ब्रिटिश राजवट ही अस्पृश्यांना वैयक्तिक आणि सामाजिक दृष्ट्या महत्वपूर्ण ठरली. पूर्वीच्या राजवटीने अस्पृश्यांना कुठलेच हक्क दिली नव्हते. ब्रिटिश राजवटीत मात्र अस्पृश्यांना डोके वर काढण्यास संधी मिळाली. या संधीचा फायदा घेऊन अस्पृश्यांनी आपल्या अंगी असलेले पराक्रम आणि बुद्धिमत्ता सिद्ध करून दाखविली. गोपाळ बाबा वलंगकर यांचे व्यक्तिमत्व ही यातूनच घडत गेले आणि त्यांनी आपल्या घडलेल्या व्यक्तिमत्त्वाचा उपयोग दलित्तोधारक समाज सुधारण्यासाठी करून घेतला.

गोपाळबाबांच्या कार्याला महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याची प्रेरणा होती सर्वप्रथम त्यानी महाराष्ट्रात अस्पृशुद्धाराचे कार्य सुरू केले. अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने ते स्वतः तळमळीने झटत. अस्पृश्य समाजातून कार्यकर्ते निर्माण व्हावे याकरिता त्यांनी जाणीवपूर्वक अस्पृश्यांच्या वस्तींना भेटी देवुन त्यांच्यातील बुद्धिमान आणि उत्साही तरुणांना हेरून अस्पृश्यांच्या कल्याणासाठी संघर्ष करण्यास प्रवृत्त करुन उत्तेजन दिली. ते त्यांना लिहायला आणि भाषणे करायला लावित. अस्पृश्याच्या सुधारनेसाठी काय करावे यासाठी ते त्याना मार्गदर्शन करीत. महात्मा फुले यांच्या तालमीत तयार झालेल्या कार्यकर्त्यामध्ये गोपाळबाबा आद्य आणि प्रमुख होते. ज्योतीबाची शिकवण आणि मार्गदर्शन यामुळे ते उत्तम लेखक,उत्तम वक्ता,आणि पट्टीचे प्रचारक झाले.

रावढळ या लहानशा गावात जन्माला येऊन नॉर्मल स्कूलची परीक्षा पास झाल्यावर ब्रिटिश फलटणीत त्यांनी नोकरी धरली परंतु पुढे नोकरी सोडून देऊन अस्पृश्यधाराच्या कार्याला प्रारंभ केला. यातच त्यांचा संबंध महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांच्या सहकाऱ्याशी येत होता .त्यातून त्यांचे पुढे घनिष्ठ संबंध निर्माण झाले. हिंदू धर्म आणि त्यांचे धर्मग्रंथ इत्यादी बाबीवर त्यांची चर्चा करून पुढे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या अस्पृश्यधाराच्या चळवळीत ते सामील झाले. साधू वृत्तीने राहून कथा कीर्तनाच्या माध्यमातून समाज जागृती करू लागले. अस्पृश्यता निवारणाला त्यांनी आपले जीवित कार्य मानले. महाराष्ट्रातील अनेक गावात त्यांनी व्याख्याने दिली. अस्पृश्यांना त्यांच्या परिस्थितीची जाणीव करून दिली, त्यांच्यात जागृती निर्माण केली. वलंगराच्या या कार्याला ज्योतिबांचे साह्य होते

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्वकालीन अस्पृश्य उद्धाराचे कार्य करणाऱ्यात जे काही समाज सुधारक पुढे आले त्यामध्ये गोपाळबाबा वलंगकर यांना पहिले मानाचे स्थान द्यावे लागेल. त्याचबरोबर आद्य पत्रकार म्हणून देखील त्यांनी फार मोठी कामगिरी केली .' दीनबंधू ', ' सुधारक ' यासारख्या साप्ताहिकातून त्यांनी बरेचसे प्रखर लेखन केलेले होते. दलित पीडित समाजाच्या दुःखाला वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी आपल्या लेखणीतून केले. सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयाने ते झपाटले होते. त्यांनी आपल्या लेखनाद्वारे सनातनी उच्चवर्णी हिंदूंची कान उघडणी केली प्रसंगी आपल्या विचारांना भावुकपणाने वाट करून दिली. तर काही वेळा आपल्या परखड लेखनाने टीका करांना प्रत्युत्तर दिले एकंदरीत गोपाळ बाबांचे वृत्तपत्रे लेखन हे स्पष्ट आणि सरळ हृदयाला हात घालणारे होते. तत्कालीन वृत्तपत्रात बऱ्याचदा अस्पृश्यांचा उल्लेख कुत्सितपणाने केला जायचा अस्पृश्यांची निंदा नालस्ती करण्याच्या उद्देशानेच तत्कालीन पत्र लेखक किंवा वार्ताहर जाणीवपूर्वक तसा उल्लेख करीत असेत

गोपाळबाबांना समाज उद्धाराचे कार्यामध्ये टीका करायचा विरोध सहन करावा लागला. वृत्तपत्रातून त्यांच्यावर टीका झाली परंतु गोपाळ बाबा डगमगले नाही. विरोधकांना त्यांनी अत्यंत संयमाने आणि स्पष्ट शब्दात प्रत्युत्तर दिले. त्यांनी स्थापन केलेल्या ' अनार्य दोष परिहारक मंडळ' या कार्यावर ' दिनबंधू ' मधून कुणीतरी साळूबाई या टोपण नावाने लेखन करून टीका टिप्पणी केली. तेव्हा गोपाळ बाबांनी उत्तर देऊन अस्पृश्यांवर करण्यात येणाऱ्या जुलमाचा मार्मिक शब्दात आढावा घेतला दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार ,चव्हाट्यावर मांडणारे दलितांच्या बाजूने वृत्तपत्रातून भूमिका घेणारे गोपाळ बाबा वलंगकर हे आद्य पत्रकार होते.

वेगवेगळ्या वर्तमानपत्रातून पंडित कोंडीराम हे टोपण नाव धारण करून त्यांनी काव्यरचना केली. आपल्या काव्यातून अस्पृश्य वरील अन्यायाला वाचा फोडली. ब्रिटिश सरकारकडे निवेदन दिली. अस्पृश्यांच्या दैनिय अवस्थेला हिंदू धर्म आणि आणि त्याचे धर्मग्रंथ कारणीभूत आहे त्यामुळे अस्पृश्यांनी स्वाभिमानासाठी अन्याय ,अत्याचाराविरुद्ध संघर्ष करावा अशी चेतावणी दिली. पद्यरचने व्यतिरिक्त गोपाळ बाबांनी अखंड लेखन केले. समाज परिवर्तनासाठी त्यांनी काव्यप्रतिनिधीचा वापर केला धर्मकर्त्यांनी बनावट धर्मग्रंथातून अस्पृश्यांना गुलाम बनविले याबाबतची जाणीव त्यांनी करून दिली शोषितांच्या संघर्षासाठी चेतना दिली हे सर्व पाहता त्यांना आद्य विद्रोही साहित्यिक म्हणता येईल

गोपाळ बाबा संसारिक जीवनात गुरफटुन राहिले नाही तर आयुष्यभर अस्पृश्यता ,दारिद्र्य व ज्ञान या विरोधात संघर्ष करीत राहिली कोकण आणि कोकणा बाहेर लोकांना भेटी देऊन त्यांनी समाज जागृतीची कार्य केले. त्यांनी स्थापन केलेल्या ' अनार्य दोष परिहारक मंडळ ' या संस्थेच्या माध्यमातून अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार बाबत जाब विचारून न थांबता प्रत्यक्ष कृती केली. महाड शहरात कापड विकत घेणाऱ्यांना दुकानदार लांबूनच कापड दाखवीत असे एकदा अंगावर टाकलेला कपडा परत घेत नसे गोपाळ बाबांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्यांना कपडे पारखून घेता येऊ लागले. धर्मशाळेत अस्पृश्यांना प्रवेश मिळत नव्हता गोपाळ बाबा वलंग करांच्या सुधारणांचे कार्यामुळे त्यांना ओसरीत राहता येऊ लागले अस्पृश्य समाजाला त्यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आणि शैक्षणिक प्रश्नासाठी सतत पाठपुरावा करीत राहिले

गोपाळ बाबांच्या सामाजिक कार्याला प्राधान्य देणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांशी त्यांची संबंध होते. तसेच सामाजिक प्रश्नांसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक परिषदेच्या कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता 1895 च्या पुणे येथील सामाजिक परिषदेच्या अधिवेशनात त्यांनी अस्पृश्यांचे प्रश्न पोट तिडकीने मांडले अस्पृश्यांना शाळा, उतारू बंगले ,पानवठे,

सरकारी नोकरी या इत्यादी ठिकाणी प्रवेश मिळावा म्हणून उच्चवर्णीयांना त्यांनी जाहीर आवाहन केले सामाजिक व्यासपीठावरून सामाजिक न्यायाची मांडणी करणारे गोपाळ बाबा विद्रोही पुरुष होय.

गोपाळ बाबांचे कार्य त्यांचे लेखन त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न सामाजिक समता व न्याय या स्थापनेसाठी स्वीकारलेली लढ्याची पद्धत पाहता ती सुसंस्कारित तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्वाची होती अशी दिसते, ते अल्पशिक्षित असून कुठेही आक्रास्थळीपणा त्यांच्या ठिकाणी असल्याचे दिसत नाही जाती व्यवस्थेने त्रस्त असलेल्या समाजाचे प्रत्यक्ष निरीक्षण करून केलेली समीक्षा तसेच समाजशास्त्रीय स्वरूपावरून त्यांनी कौतुकास्पद आहे. 'आम्ही जुलूम सहन केला म्हणून हिंदूंनी अन्याचे सत्र सुरू ठेवले आम्ही प्रतिकार केला असता तर आमचे जीवन बदलले असते' डॉ. आंबेडकर सारखेच मूलगामी विचार त्यांनी मांडले अन्य अत्याचाराची परंपरा सुरू का राहिली याची त्यांनी विश्लेषण केले

हिंदू धर्मातील विचार व व्यवहारातील विसंगती पाहून गोपाळबाबांनी उपस्थित केलेले बुद्धिनिष्ठ प्रश्न पाहता त्यांच्या तात्विक व्यासंगी व्यक्तिमत्त्वाची ओळख पटते एकंदरीत बाबासाहेब आंबेडकर पूर्वकालीन आद्य कृतिशील तत्त्वचिंतक समाज सुधारक पत्रकार साहित्यक या सर्व क्षेत्रात गोपाळ बाबा वलंकारांनी आपल्या कार्याने वैशिष्ट्यपूर्ण ठसा उटविला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. आद्य अस्पृश्योध्दारक गोपाळबाबा वलंगकर- सी.एच. निकुंभे
२. सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन- एस. जी. देवगावकर, जयमला डुंमरे
३. आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास- दिनेश मोरे
४. मध्यप्रांत वऱ्हाडातील अस्पृश्य महार चळवळीचा - इतिहासबबन लव्हात्रे
५. मध्यप्रांत वऱ्हाडातील डॉ. आंबेडकर पूर्व चळवळ - वसंत मुन